

# बीज



इथं काय रुजतं ?
मातीखाली निजतं
पाण्याने भिजतं,
इथं आहे इवलं
सुरेखसं बीज !



एवढासा कोंब
हळूच येईल वर,
सूर्य म्हणेल त्याला
माझा हात धर.



अंगाई गाणं
वारा गाईल त्याला,
झुलता झुलता
पानं येतील त्याला.



इवल्याशा रोपाचं
झाड होईल छान,
फुला-फळांनी
बहरेल रान.

– सुशील पगारिया

5CLHU3

# माझे खेळ

◉ चित्र बघ, चित्रात काय काय दिसते ते सांग.









5CVDVQ

# माझे मित्र

◉ **चित्र बघ, ऐक. तुझ्या मित्रांविषयी माहिती सांग.**

**माझे खूप सारे मित्र आहेत.**







माझ्या काही मित्रांना शेपटी आहे आणि काही मित्रांना तर पायच नाहीत.


माझे काही मित्र पाण्यात राहतात.


# माझे कुटुंब

◉ चित्र बघ. ऐक. चित्रांविषयी गप्पा मार.




अगं आई, आता माझा अभ्यास पूर्ण झाला आहे. मी बाबांकडे बागेत जाते.

बाबा! बाबा! आपली बाग किती सुंदर आहे. किती सुंदर फुले फुलली आहेत. मी तुम्हांला पाणी घालायला मदत करू का?





दादा, मलाही तुमच्याबरोबर खेळायचं आहे.




आजी–आजोबा, तुम्ही इथे बसला आहात होय? चला, आता आपण घरी जाऊया.


5NZRAM

# वाचनपूर्व व लेखनपूर्व तयारी


- जोड्या जुळव.



- चित्र बघ.



- नाव सांग, नाव दाखव.



कप मासा लाटणे पालक

- जोड्या जुळव.



मासा

लाटणे

पालक

कप

- शब्द पाहा, सारख्या शब्दांच्या जोड्या जुळव.

| | |
|---|---|
| कप | लाटणे |
| पालक | मासा |
| मासा | पालक |
| लाटणे | कप |


- मुंगळा गुळापर्यंत कसा जाईल ते दाखव.









## बघ, गिरव, काढ.







5P9MCA

## क म आ ल ा

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.




कप



कपाट



कढई



कणीस

◉ 'क' आवाज ऐक. 'क' अक्षर पाहा. 'क' अक्षराला ◯ कर.

काका

मका नाक

झोका **क** सकाळ

कपाळ कळी


काकडी



गिरव, लिही, म्हण.

क

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.

|  |  |  |  |
|---|---|---|---|
| मांजर | माकड | मोर | मासा |

◉ 'म' आवाज ऐक. 'म' अक्षर पाहा. 'म' अक्षराला ◯ कर.

म

मगर

कमला

मामा

सामान

मैना


काम

मीरा

सोमवार



गिरव, लिही, म्हण.



म

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.



आगगाडी



आवळा



आरसा



आंबा

◉ 'आ' आवाज ऐक. 'आ' अक्षर पाहा. 'आ' अक्षराला ◯ कर.

आपण

आम्ही आज

आठ **आ** आवाज

आनंद आजी

आई



गिरव, लिही, म्हण.

आ

आ

◉ चित्र बघ, नाव सांग, नाव दाखव.


लसूण


लाडू


लिंबू


लेझीम

◉ 'ल' आवाज ऐक. 'ल' अक्षर पाहा. 'ल' अक्षराला ◯ कर.

ल

गाल

लाकूड

रुमाल

बैल


लांब

वेल

खोकला

पालक


गिरव, लिही, म्हण.



◉ बघ. ऐक. म्हण.

# ा







| म | ा | म ा   म ा   मा |
|---|---|---|

| क | ा | क ा   क ा   का |
|---|---|---|

| ल | ा | ल ा   ल ा   ला |
|---|---|---|

◉ शब्द वाच, लिही.

| काम | मला | लाल | मामा |
|---|---|---|---|
| ................ | ................ | ................ | ................ |
| ................ | ................ | ................ | ................ |
| आला | काका | मका | |
| ................ | ................ | ................ | |
| ................ | ................ | ................ | |

5PIIDX

# पाऊस

- गोष्ट ऐक. त्याप्रमाणे चित्र काढ.

दिनू शाळेतून घरी निघाला होता. आकाशात काळे ढग जमा झाले होते. थोड्या वेळातच पावसाला सुरुवात झाली. आकाशातून पाण्याचे थेंब खाली येत होते. दिनूला त्याची गंमत वाटली.

दिनू थेंबाला म्हणाला, '' थेंबा थेंबा, जरा माझ्याशी बोल.'' थेंब म्हणाला, ''काय रे दिनू?'' दिनू म्हणाला, ''तू आकाशातून उंचावरून येतोस हे दिसले मला ; पण तू आकाशात गेलास कसा ते काही कळले नाही मला!''

थेंब म्हणाला, ''अरे खूप ऊन पडले, की आम्ही खूप खूप तापतो, आमची वाफ होते, वाफ हलकी हलकी असते. ती वर वर आकाशात जाते. मग वाफेचे ढग तयार होतात. ढगाला गारगार वारा लागतो, मग आम्ही खाली येतो, तुम्हांला पाणी द्यायला. नदी, नाले, तळी भरायला.''



5PSEFK